मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# धनादेश दिले, 'बाऊन्स' झाले! पिंपरी महापालिकेचा कारवाईचा इशारा

## शहरातील मिळकतधारकांनी करापोटी दिलेले 275 धनादेश बाऊन्स झाल्याने मिळकत जप्तीचा इशारा देण्यात आला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील मिळकतधारकांनी कराचा भरणा करण्यासाठी दिलेले दोन कोटी ५२ लाख रुपये रकमेचे २७५ धनादेश वटलेच नाहीत. संबंधितांना महापालिकेकडून नोटीस देण्यात येणार आहे. मिळकतकराचा भरणा न केल्यास मिळकत जप्त करून कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा करसंकलन विभागाने दिला आहे.

मिळकतरापोटी भरलेले काही धनादेश विविध कारणांनी वटले नाहीत, तर महापालिकेला धनादेश न वटल्याचा दंड बसतो. कागदोपत्री कामही वाढते. करवसुलीलाही विलंब होतो. २०२५-२६ या आर्थिक वर्षात असे दोन कोटी ५२ लाख रुपये रकमेचे २७५ धनादेश वटले नाहीत. आता या मिळकतधारकांकडून धनादेश स्वीकारला जाणार नसून, त्यांना ऑनलाइन वा रोखीच्या स्वरूपातच कराचा भरणा करावा लागेल.

मिळकतकरापोटी प्राप्त झालेल्या धनादेशांपैकी दोन कोटी ५२ लाख रुपयांचे २७५ धनादेश वटले नाहीत. ज्या मिळकतधारकांचे धनादेश बाउन्स झाले, त्यांना नोटीस देण्यात येणार आहे. त्यांना पैसे भरण्यासाठी मुदत दिली जाईल. मुदतीत करभरणा न केल्यास मिळकत जप्त करून कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या करसंकलन विभागाचे उपायुक्त सचिन पवार यांनी सांगितले.



### मिळकतकर भरणा प्रक्रियेची वैशिष्ट्ये

- एप्रिल व मेमध्ये मिळून २८० कोटी रुपयांचा मिळकतकर जमा.
- मिळकतकर जमा करणारे एकूण मिळकतधारक : २ लाख ७१ हजार ५
- सर्वाधिक भरणा : वाकड विभागीय कार्यालयात ४० कोटी रुपये.
- सर्वाधिक भरणा निवासी मिळकतधारकांकडून, १९२ कोटी रुपये.
- बिगरनिवासी मिळकतधारकांकडून ५३ कोटी ८७ लाख रुपये
- मिश्र मिळकतधारकांकडून १६ कोटी रुपये
- मोकळी जागा व इतर मिळकतधारकांकडून १९ कोटी रुपये.
- •ऑनलाइन भरणा : २ लाख ४३ हजार २०१ मिळकतधारकांकडून २५७ कोटी ९१ लाख रुपये.

# अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस आयुक्तांचे कडक आदेश

## पिंपरी-चिंचवडमधील फुगेवाडी येथील विषारी दारूकांडात 17 जणांचा मृत्यू झाल्यानंतर पोलीस प्रशासन ॲक्शन मोडवर

**पिंपरी | प्रतिनिधी**

फुगेवाडीतील विषारी दारु प्रकरणात १७ लोकांचा मृत्यू झाल्यानंतर पिंपरी-चिंचवड पोलिसांनी अवैध धंद्याविरोधात कठोर पाऊले उचलण्यास सुरुवात केली आहे. पोलीस निरीक्षकांपासून अपर पोलीस आयुक्तांना अवैध धंदे बंद असल्याला अहवाल दर महिन्याला देणे बंधनकारक करण्यात आले आहे. अवैध धंद्याकडे दुर्लक्ष, चालकांना पाठिशी घातल्यास शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशारा पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिला आहे.

फुगेवाडीतील विषारी दारूकांड प्रकरणात १७ नागरिकांचा मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्हे उपस्थित करण्यात येत होते. अवैध दारूविक्रीसह विविध अवैध धंद्यांविरोधात वेळोवेळी कठोर कारवाईच्या सूचना देऊनही स्थानिक स्तरावरील दुर्लक्षामुळे ही दुर्घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे. कारवाईच्या सूचना देऊनही अवैध धंदे चालू आहेत. वरिष्ठांनी दिलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष केले जाते. या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्त चौबे यांनी अवैध धंद्यांबाबत थेट जबाबदारी निश्चित करणारा महत्त्वपूर्ण आदेश जारी केला आहे.

पोलीस ठाणे, विभाग, परिमंडळ आणि प्रादेशिक स्तरावर उत्तरदायित्वाची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. अवैध धंदेचालकांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष पाठबळ, त्यांच्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष, कारवाईत कुचराई केल्यास कठोर शिस्तभंगाची कारवाई केली जाणार असल्याचे आदेशात स्पष्ट केले आहे.



### दर महिन्याला प्रमाणपत्र द्यावे लागणार

- वरिष्ठ पोलीस निरीक्षकाला ठाण्याच्या हद्दीतील अवैध धंद्याचे उच्चाटन करणे आणि हद्दीतील सर्व अवैध धंदे बंद असल्याबाबतचे लेखी प्रमाणपत्र दर महिन्याच्या एक तारखेला सहायक पोलीस आयुक्तांना सादर करावे लागणार आहे. सहायक आयुक्तांना सर्व अवैध धंदे बंद असल्याची खात्री करुन लेखी प्रमाणपत्र पोलीस उपायुक्तांना तीन तारखेपर्यंत द्यावे लागणार आहे. पोलीस उपायुक्त परिमंडळातील सर्व ठाण्याच्या हद्दीतील धंदे बंद असल्याची खात्री करुन अपर पोलीस आयुक्त (प्रादेशिक) यांना पाच तारखेपर्यंत प्रमाणपत्र सादर करतील. अपर पोलीस आयुक्त दर महिन्याच्या दहा तारखेला अवैध धंदे बंद असल्याचा अहवाल सादर करतील.

# विषारी दारुकांडातील आरोपी कर्नेलसिंगच्या घरासह दारूअड्डा 'भुईसपाट'

## फुगेवाडी दारुकांडानंतर प्रशासनाचा मोठा निर्णय; आरोपी कर्नेलसिंग विरका यांच्या अनधिकृत घरासह दारू अड्ड्यावर कारवाई



**पिंपरी | प्रतिनिधी**

फुगेवाडीतील विषारी दारुकांडानंतर प्रशासनाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली असून, या प्रकरणातील आरोपी कर्नेलसिंग विरका यांच्या अनधिकृत घरासह दारू अड्डयावर गुरुवारी (दि.४) पिंपरी-चिंचवड महापालिकेने पाडकामाची कारवाई केली आहे. विषारी दारू विक्रीचे केंद्र ठरलेल्या या ठिकाणावर अखेर महापालिकेने हातोडा चालवला आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या झोपडपट्टी पुनर्वसन विभागाच्या वतीने 'ह' क्षेत्रीय कार्यालयाच्या सहकार्याने संजयनगर, फुगेवाडी येथील झोपडपट्टीतील विनापरवाना झोपडीवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. या संयुक्त कारवाईमध्ये सुमारे ८७५ चौरस फूट क्षेत्रफळावरील अनधिकृत झोपडीचे बांधकाम निष्कासित करण्यात आले.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या निर्देशानुसार तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली, उप आयुक्त अण्णा बोदडे व कार्यकारी अभियंता राजेंद्र शिंदे यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई राबविण्यात आली.

कारवाईदरम्यान कार्यकारी अभियंता उमेश मोने, उपअभियंता संदिप पाडवी, महेंद्र देवरे, प्रशांत कोतकर, सुनिल दांगडे, सुनिल हरिदास तसेच कनिष्ठ अभियंते सतीश डांगे, अशोक पाटील, वनिता बवले, योगेश शेवलकर, विशाल नेवाळे, सुरेश लंगोटे, कल्याणी वाघमारे, धनश्री हंडे, ज्योती चांदगुडे, प्रीती बिजवे यांच्यासह बीट निरीक्षक व अतिक्रमण पथक सहभागी होते. तसेच ह क्षेत्रीय कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी, २० एमएसएफ जवान यांच्या उपस्थितीत तसेच ०४ ब्रेकर, ०२ गॅस कटर व सुमारे ४० मजुरांच्या सहाय्याने ही कारवाई पार पडली.

महापालिकेने २ जून रोजी संबंधित बांधकाम अनधिकृत असल्याचे नमूद करत नोटीस बजावली होती. तसेच २४ तासांच्या आत बांधकाम स्वतःहून हटविण्याचे आदेश दिले होते. मात्र, सध्या न्यायालयीन कोठडीत असलेल्या कर्नेलसिंग विरका यांच्याकडून केवळ घरातील साहित्य हटविण्यात आले होते. त्यामुळे महापालिकेने आज प्रत्यक्ष पाडकामाची कारवाई हाती घेतली.

### महापालिकेची धडक कारवाई

» फुगेवाडीतील विषारी दारूकांडानंतर पिंपरी-चिंचवड महापालिकेने आरोपी कर्नेलसिंग विरका यांच्या अनधिकृत घरावर बुलडोझर चालवत कठोर संदेश दिला. संजयनगर येथील सुमारे ८७५ चौरस फूट क्षेत्रफळावरील विनापरवाना बांधकाम हटविण्यात आले. यापूर्वी महापालिकेने नोटीस बजावून बांधकाम स्वतः हटविण्याची संधी दिली होती. मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्याने प्रत्यक्ष पाडकामाची कारवाई करण्यात आली. विषारी दारू विक्रीचे केंद्र म्हणून चर्चेत आलेल्या या ठिकाणावरील कारवाईमुळे बेकायदा धंदे आणि अनधिकृत बांधकामांविरोधात प्रशासनाने कठोर भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

### अनधिकृत बांधकामांवर 'झिरो टॉलरन्स'चा संदेश

» फुगेवाडी दारूकांडानंतर झालेली ही कारवाई केवळ एका बांधकामावरील कारवाई नसून प्रशासनाच्या 'झिरो टॉलरन्स' धोरणाची घोषणा मानली जात आहे. बेकायदा दारू विक्री, अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकामांना कोणतीही मुभा दिली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा महापालिकेने दिला आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण करणाऱ्या आणि गुन्हेगारी कारवायांशी संबंधित ठिकाणांवर यापुढेही अशाच धडक मोहिमा राबविण्यात येणार असल्याचे संकेत प्रशासनाकडून देण्यात आले आहेत. त्यामुळे शहरातील इतर अनधिकृत बांधकामधारकांमध्येही धास्ती निर्माण झाली आहे.

# पिंपरी चिंचवड महापालिकेच्या महिला आयटीआयमध्ये ऑगस्ट 2026 प्रवेश प्रक्रिया सुरू...

## 140 जागांसाठी कॅप राऊंडद्वारे दिले जाणार प्रवेश; विद्यार्थिनींसाठी निःशुल्क अर्ज सुविधा उपलब्ध...




**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कासारवाडी येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्था (महिला) या संस्थेत ऑगस्ट २०२६ प्रवेश सत्राकरिता प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. संस्थेतील सर्व प्रवेशित जागांवर शासन नियमावली व आरक्षणानुसार कॅप राऊंड प्रणालीद्वारे प्रवेश देण्यात येणार आहेत, अशी माहिती संस्थेचे प्राचार्य शशिकांत पाटील यांनी दिली आहे.

कासारवाडी येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत कॉम्प्युटर ऑपरेटर अँड प्रोग्रामिंग असिस्टंट, डी.टी.पी., कॉस्मेटोलॉजी, फॅशन डिझायनिंग अँन्ड टेक्नॉलॉजी, हॉस्पिटल हाऊसकीपिंग हे प्रत्येकी एक वर्ष कालावधीचे अभ्यासक्रम चालविले जातात. या अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी किमान शैक्षणिक अर्हता दहावी उत्तीर्ण एवढी आहे. तर संस्थेच्या वतीने इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक हा दोन वर्ष कालावधीचा अभ्यासक्रम चालविला जात असून यासाठी किमान शैक्षणिक अर्हता दहावी उत्तीर्ण आहे. या सर्व अभ्यासक्रमांच्या मिळून एकूण १४० जागा उपलब्ध असून विद्यार्थिनींना प्रवेश प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी ऑनलाइन अर्ज भरण्याची सुविधा संस्थेमध्ये निःशुल्क उपलब्ध करून देण्यात आली आहे. याशिवाय येथे रोजगारक्षम तसेच स्वयंरोजगाराच्या अनेक संधीही उपलब्ध आहेत.

या प्रवेश प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती HTTPS://ADMISSION.DVET.GOV.IN या संकेतस्थळावर उपलब्ध असून विद्यार्थिनींनी अधिक माहितीसाठी या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

> महिला सक्षमीकरणासाठी कौशल्याधारित शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमार्फत विद्यार्थिनींना रोजगाराभिमुख प्रशिक्षणाची संधी उपलब्ध होत आहे. अधिकाधिक विद्यार्थिनींनी या प्रवेश प्रक्रियेत सहभागी होऊन आपल्या करिअरला नवी दिशा द्यावी.
>
> - डॉ.विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

> औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत उपलब्ध असलेले विविध तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रम विद्यार्थिनींना रोजगारक्षम बनविण्यास उपयुक्त ठरत आहेत. प्रवेश प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येत असून इच्छुक विद्यार्थिनींनी ऑनलाइन अर्ज भरून या संधीचा लाभ घ्यावा.
>
> - शशिकांत पाटील, विभागप्रमुख तथा प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोरवाडी..

# पुणे महापालिकेत मुख्य लेखा व वित्त अधिकारी पदावरून संघर्ष! आयुक्तांना दिला इशारा...

## महानगरपालिकेच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी पदावरील नियुक्तीवरून पालिका प्रशासन आणि राज्य सरकारमध्ये संघर्ष पेटण्याची चिन्हे आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या आर्थिक नाड्या हाती असणाऱ्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी पदावर राज्य सरकारने प्रतिनियुक्तीवर अधिकारी पाठविल्याने महापालिकेत नाराजी पसरली आहे. महापालिकेतील अधिकाऱ्यांची सेवा ज्येष्ठता डावलून बाहेरील व्यक्तीची नियुक्ती करण्यात आल्याने महापालिकेत संघर्ष निर्माण होणार आहे.

महापालिकेच्या सेवेत राज्य सरकारकडून आलेल्या अधिकाऱ्याला रुजू करून घेऊ नये, असे पत्र उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी डॉ. कुणाल मंडवाले यांनी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांना पाठविले आहे. या पदावर महापालिकेच्या अधिकाऱ्याचा हक्क असून तो डावलला जाऊ नये, अशी मागणी केली जात आहे.

महापालिकेत केलेल्या १५ वर्षांच्या सेवेचा व ज्येष्ठतेचा विचार करून पदोन्नती न दिल्यास, मुंबई उच्च न्यायालयात धाव घेऊन दाद मागितली जाईल, असा थेट इशारा डॉ. मंडवाले यांनी दिला आहे. त्यामुळे पुणे महापालिकेच्या वित्त विभागात महापालिकेतील अधिकारी विरुद्ध बाहेरचा अधिकारी असा वाद पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

राज्य सरकारच्या वित्त विभागाने २९ मे रोजी एक आदेश प्रसिद्ध करून शासनाच्या वित्त विभागातील अधिकारी भगवान दत्तात्रय घाडगे यांची पुणे महानगरपालिकेच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी या रिक्त पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती केली आहे. यापूर्वी देखील राज्य सरकारने पुणे महापालिकेत शासनाच्या अधिकाऱ्याची प्रतिनियुक्ती वर बदली केली होती. त्यामुळे या पदावर महापालिकेतील अधिकाऱ्याची वर्णी लागली नव्हती. महापालिकेच्या सेवेत वर्षानुवर्ष काम करणाऱ्या अधिकाऱ्यावर हा अन्याय असून याचा गांभीर्याने विचार व्हावा अशी मागणी जोर धरू लागली आहे.



### डॉ. मंडवाले यांची न्यायालयीन लढाईची तयारी

**» उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी डॉ. कुणाल मंडवाले यांनी मुख्य लेखा व वित्त अधिकारी पदावर आपला हक्क असल्याचा दावा केला आहे. गेल्या १५ वर्षांपासून महापालिकेत सेवा बजावत असल्याने सेवाज्येष्ठतेच्या आधारावर पदोन्नती मिळणे अपेक्षित असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. राज्य शासनाच्या प्रतिनियुक्ती आदेशामुळे त्यांचा पदोन्नतीचा मार्ग बंद होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. पदोन्नती न दिल्यास मुंबई उच्च न्यायालयात दाद मागण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. त्यामुळे हा प्रशासकीय वाद आता न्यायालयीन पातळीवर जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**

### ज्येष्ठता विरुद्ध प्रतिनियुक्ती

**» पुणे महापालिकेतील मुख्य लेखा व वित्त अधिकारी पदावरील नियुक्तीमुळे ज्येष्ठता आणि प्रतिनियुक्तीचा वाद पुन्हा समोर आला आहे. महापालिकेच्या सेवेत अनेक वर्षे कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांना पदोन्नतीची संधी मिळण्याऐवजी राज्य शासनाकडून प्रतिनियुक्तीवर अधिकारी पाठविले जात असल्याची नाराजी व्यक्त होत आहे. यामुळे स्थानिक अधिकाऱ्यांच्या करिअर प्रगतीवर परिणाम होत असल्याचा आरोप केला जात आहे. प्रशासनातील अनुभवी अधिकाऱ्यांना संधी देणे आणि बाहेरील अधिकाऱ्यांचा अनुभव वापरणे यामध्ये समतोल साधण्याचे आव्हान प्रशासनासमोर उभे राहिले आहे.**

### महापालिकेतील अधिकाऱ्यांमध्ये असंतोष

**» गेल्या काही वर्षांत पुणे महापालिकेत प्रतिनियुक्तीवरील अधिकाऱ्यांची संख्या वाढल्याने स्थानिक अधिकाऱ्यांमध्ये असंतोष वाढत आहे. सहाय्यक आयुक्त, उपायुक्त आणि वरिष्ठ प्रशासकीय पदांवर शासनाकडून अधिकारी नियुक्त केले जात असल्याने महापालिकेतील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीसाठी दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागत आहे. यामुळे अनुभवी अधिकाऱ्यांचे मनोबल खच्ची होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. लेखा विभागातील ताज्या नियुक्तीमुळे हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, भविष्यात महापालिका प्रशासन आणि कर्मचारी संघटनांमध्ये संघर्ष निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.**

---

# अतिरिक्त आयुक्तांनीच पकडली चोरी! पावसाळी वाहिन्यांच्या स्वच्छतेची पोलखोल...

## कागदावर काम दाखवणाऱ्या उपअभियंत्यांसह क्षेत्रीय अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले; कामात हलगर्जीपणा आढळल्यास थेट निलंबनाचा इशारा.

**पुणे | प्रतिनिधी**

पावसाळावर तोंडावर आलेला असतानाही शहरातील पावसाळी चेंबर, तसेच नालेसफाईची कामे अद्यापही पूर्ण झालेली नाहीत. त्यातच या कामांची तपासणी करण्यासाठी गेलेल्या अतिरिक्त आयुक्तांनीच केवळ कागदावर झालेल्या कामांची पोलखोल केली आहे. याप्रकरणी अतिरिक्त आयुक्त प्रजीत नायर यांनी कसबा आणि विश्रामबागवाडा क्षेत्रीय कार्यालयांच्या सहाय्यक महापालिका आयुक्तांसह उपअभियंत्याला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

हा प्रकार उघडकीस आल्यानंतर अतिरिक्त आयुक्त नायर यांनी परिमंडळ उपायुक्त, तसेच क्षेत्रीय अधिकाऱ्यांची बैठक घेऊन आपण शहरात नियमित तपासणी करणार असून, असे प्रकार उघडकीस आल्यास संबधितांवर थेट निलंबनाची कारवाई केली जाईल, असा इशाराही दिला आहे.

महापालिकेकडून यावर्षी नाले सफाई, पावसाळी वाहिन्यांची सफाई, तसेच चेंबर सफाईचे काम क्षेत्रीय कार्यालयांकडे देण्यात आले आहे. त्यांच्याकडून ते वर्षभर केले जाणे अपेक्षित आहे. त्याअंतर्गत झालेल्या कामांची तपासणी करण्यासाठी अतिरिक्त आयुक्त नायर यांनी कसबा आणि विश्रामबागवाडा क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत कामाची तपासणी केली.

या वेळी त्यांनी काही पावसाळी चेंबर उघडून दाखविण्याच्या सूचना केल्या. त्या वेळी या चेंबरमध्ये मोठ्या प्रमाणात झाडांचा पाला, कचरा, तसेच गाळ आढळून आला. त्यावर उपअभियंता, तसेच क्षेत्रीय अधिकाऱ्यांना कोणतेही उत्तर देता आले नाही. त्यामुळे नायर यांनी थेट तिमय्या जगले आणि प्रदीप आव्हाड या दोन्ही सहायक महापालिका आयुक्तांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

या प्रकारानंतर अतिरिक्त आयुक्त नायर यांनी घेतलेल्या आढावा बैठकीत पावसाळापूर्वीची कामे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश दिले. आतापर्यंत सरासरी ७७ टक्के काम झाले असून, उर्वरीत ३३ टक्के काम पूर्ण करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ व यंत्रसामग्री उपलब्ध करून देण्याचे निर्देश नायर यांनी दिले. पुढील आठवड्यापासून नाले व कल्व्हर्ट कामांची प्रत्यक्ष पाहणी करून कामांच्या गुणवत्तेची तपासणी करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



> **“प्रत्यक्ष काम झालेल्या ठिकाणी पाहणी केल्यावर काम झाले नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे या दोन्ही अधिकाऱ्यांना, तसेच अभियंत्यालाही कारण दाखवा नोटीस देण्यात आली आहे.”.**
>
> **- प्रजीत नायर, अतिरिक्त महापालिका आयुक्त**

# बारामतीतील अपघातानंतर रेडबर्डची सुरक्षा कडक; प्रशिक्षण आणि देखरेख प्रक्रियेत सुधारणा

## बारामती विमान दुर्घटनेनंतर अतिरिक्त प्रशिक्षण, कठोर देखरेख, सुधारित एसओपी आणि विमान तपासण्यांची वारंवारता वाढविण्याचा निर्णय

**पुणे | प्रतिनिधी**

बारामतीजवळील प्रशिक्षण विमानाच्या अपघातानंतर रेडबर्ड फ्लाइट ट्रेनिंग अकादमीने सुरक्षा उपाययोजना आणि कार्यपद्धतीत व्यापक सुधारणा करण्याची घोषणा केली आहे. अकादमीने प्रशिक्षक, विद्यार्थी वैमानिक आणि कार्यकारी कर्मचाऱ्यांसाठी अतिरिक्त सुरक्षा मार्गदर्शन सत्रे, पुनर्प्रशिक्षण कार्यक्रम आणि मानकीकरण कार्यशाळा सुरू केल्या आहेत.

१३ मे रोजी बारामती विमानतळाजवळील गोजुबावी परिसरात अकादमीचे प्रशिक्षण विमान आपत्कालीन स्वरूपात कोसळले होते. उड्डाणानंतर काही वेळातच विमानात तांत्रिक बिघाड निर्माण झाल्याने ही घटना घडल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले होते. या घटनेनंतर अकादमीने अंतर्गत पातळीवर सखोल आढावा घेत सुरक्षा व्यवस्थेचे पुनर्मूल्यांकन केले आहे.




अकादमीने सुधारित प्रशिक्षण आराखड्यात परिस्थितीजन्य जागरूकता, जोखीम मूल्यांकन, तणावपूर्ण परिस्थितीत निर्णयक्षमता आणि सुरक्षा विषयक घटनांचे सक्रिय अहवाल देण्याची संस्कृती विकसित करण्यावर अधिक भर दिला आहे.

रेडबर्ड फ्लाइट ट्रेनिंग अकादमीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अश्विनी आचार्य यांनी सांगितले की, अकादमीने नेहमीच सुरक्षा आणि नियामक नियमांचे पालन यांना सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. अलीकडील घटनेनंतर सर्व प्रशिक्षण केंद्रांवरील सुरक्षा यंत्रणा आणि कार्यनियंत्रण अधिक मजबूत करण्यात आले आहे. आवश्यकतेनुसार मानक कार्यपद्धतींचा (एसओपी) आढावाही घेऊन त्यात सुधारणा करण्यात आल्या आहेत.

नवीन सुरक्षा आराखड्या अंतर्गत उड्डाण मंजुरी आणि देखरेख प्रक्रिया अधिक कठोर करण्यात आली असून, उड्डाणापूर्वी व उड्डाणानंतरच्या मार्गदर्शन सत्रांची संख्या वाढविण्यात आली आहे. तसेच जोखीम मूल्यांकन प्रक्रिया, सुरक्षा अहवाल प्रणाली, प्रशिक्षण उड्डाणे आणि देखभाल कामकाजाच्या नोंदी व निरीक्षण व्यवस्थाही अधिक सक्षम करण्यात आली आहे.

### देखभाल आणि लेखापरीक्षणाला गती

» रेडबर्ड फ्लाइट ट्रेनिंग अकादमीने विमान देखभाल आणि सुरक्षा लेखापरीक्षण प्रक्रियाही अधिक सक्षम केली आहे. अंतर्गत पुनरावलोकनात विमानांची तांत्रिक तपासणी, देखभाल मानके, पर्यवेक्षण व्यवस्था आणि सुरक्षा नियंत्रण यंत्रणेची सखोल छाननी करण्यात आली. यानंतर अंतर्गत सुरक्षा लेखापरीक्षणे, विमान तपासण्या आणि देखभाल पुनरावलोकनांची वारंवारता वाढविण्यात आली आहे. अभियांत्रिकी देखरेख आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक मजबूत करण्यात आल्याने प्रशिक्षण विमानांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यास मदत होणार आहे. अकादमीने नियामक नियमांचे पालन आणि सुरक्षित उड्डाण प्रशिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे.

### सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य

» बारामतीजवळील प्रशिक्षण विमानाच्या अपघातानंतर रेडबर्ड फ्लाइट ट्रेनिंग अकादमीने सुरक्षा व्यवस्थेत व्यापक सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रशिक्षक, विद्यार्थी वैमानिक आणि कर्मचाऱ्यांसाठी विशेष सुरक्षा मार्गदर्शन सत्रे, पुनर्प्रशिक्षण कार्यक्रम आणि मानकीकरण कार्यशाळा सुरू करण्यात आल्या आहेत. परिस्थितीजन्य जागरूकता, जोखीम मूल्यांकन आणि आपत्कालीन परिस्थितीत योग्य निर्णयक्षमता विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे. उड्डाण प्रशिक्षण अधिक सुरक्षित आणि प्रभावी करण्यासाठी अकादमीने सुरक्षा संस्कृती मजबूत करण्याचा संकल्प केला असून, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी सर्व स्तरांवर काटेकोर उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

### उड्डाण प्रक्रियेत कठोर बदल

» अकादमीने उड्डाण मंजुरी, देखरेख आणि प्रशिक्षण प्रक्रियेत महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. उड्डाणापूर्वी आणि उड्डाणानंतरच्या मार्गदर्शन सत्रांची संख्या वाढविण्यात आली आहे. जोखीम मूल्यांकन, सुरक्षा अहवाल प्रणाली आणि प्रशिक्षण उड्डाणांच्या नोंदींचे निरीक्षण अधिक कठोर करण्यात आले आहे. मानक कार्यपद्धतींचा (SOP) पुनरावलोकन करून आवश्यक सुधारणा लागू करण्यात आल्या आहेत.

# टाकवे बुद्रुकमध्ये स्टोन क्रशरविरोधात ग्रामस्थांचा एल्गार; शेकडो नागरिक रस्त्यावर

## मावळ तालुक्यातील टाकवे बुद्रुक येथील खंडोबा चौक परिसरातील स्टोन क्रशर बंद करण्याच्या मागणीसाठी ग्रामस्थांनी तीव्र आंदोलन छेडले.

**पुणे | प्रतिनिधी**

मावळ तालुक्यातील टाकवे बुद्रुक येथील खंडोबा चौकात परिसरातील स्टोन क्रशर बंद करण्याच्या मागणीसाठी ग्रामस्थांनी तीव्र आंदोलन छेडले. रखरखत्या उन्हात शेकडो महिला, व्यापारी, युवक आणि ग्रामस्थ रस्त्यावर उतरून प्रशासनाविरोधात आंदोलन केले.



टाकवे, बेलज व परिसरातील स्टोन क्रशरमधून मोठ्या प्रमाणात होणारी वाहतूक, धूळ प्रदूषण आणि रस्त्यावर साचणारी खडी यामुळे नागरिकांचे जीवन धोक्यात आले असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. स्टोन क्रशरमधून वाहतूक करणाऱ्या गाड्यामुळे संपूर्ण गाव धुळीने व्यापले असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच रस्त्यावर पडणाऱ्या खडीमुळे लहान-मोठे अपघात वारंवार घडत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली.

शाळकरी विद्यार्थ्यांना शाळेत जाताना, महिलांना दैनंदिन कामांसाठी बाहेर पडताना तसेच सर्वसामान्य नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे.

टाकवे बुद्रुक ग्रामपंचायतीने यापूर्वी स्टोन क्रशरला दिलेल्या सर्व परवानग्या व ठराव रद्द करून तहसीलदार, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महाराष्ट्र शासन, संबंधित सर्व शासकीय विभागांना पत्रव्यवहार केला असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. मात्र, याबाबत प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप करण्यात आला.

### 'स्टोन क्रशरविरोधात ग्रामस्थांचा एल्गार'

» मावळ तालुक्यातील टाकवे बुद्रुक येथे स्टोन क्रशरमुळे निर्माण झालेल्या धूळ प्रदूषण, वाढती जडवाहतूक आणि अपघातांच्या घटनांविरोधात ग्रामस्थांनी तीव्र आंदोलन छेडले आहे. खंडोबा चौकात झालेल्या या आंदोलनात महिला, युवक, व्यापारी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. स्टोन क्रशरमधून होणाऱ्या वाहतुकीमुळे गावातील रस्ते खराब होत असून शाळकरी विद्यार्थी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. ग्रामपंचायतीने परवानग्या रद्द करूनही कारवाई होत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून स्टोन क्रशर हटवावेत, अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला.